नि.फौ.ख.क्र.४६७/२०२३
शासन–वि–शंकर व इतर
नि.क्र. ४३

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – विजय शंकरराव चचाणे
वय अंदाजे ५० वर्ष, कामधंदा– शेती ,
राहणार– मौजा काजळसरा, ता. देवळी, जि.वर्धा

..........................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र.१ ची सरतपासणी सहा सरकारी वकील श्रीमती डि.पी.गेडाम यांच्या मार्फत.**

१. संजय आरोपी क्र.१ हा माझा भाउ आहे. आरोपी क्र.२ मारोती हे आरोपी क्र.१ चे सासरे आहे. आरोपी क्र.३ माझी भावजई आहे. आरोपी क्र.४ प्रशांत हा आरोपी क्र.१ चा साळा आहे. घटना दि.२२.०७.२०२३ रोजी, आरोपी क्र.१ ते ४ माझ्या गांवी मौजा काजळसरा येथे ट्रॅक्टरसह आले होते. ट्रॅक्टर त्यांना आम्ही शेतात टाकू दिला नाही. त्यामुळे आरोपी क्र.१ ते ४ यांच्यासोबत वाद झाला. आरोपी संजय चचाणे यांनी माझ्या पायावर, गुडग्यावर, कमरेवर मारले. आरोपी माराती नागोशे याचेकडे काडी होती, त्याने मला अंगावर, डोक्यावर मारले. आरोपी प्रशांत नागोशे यांनी सुध्दा मला काठीने मारले. गावातील पोलीस पाटील व उपसरपंच तेथे आले, त्यांनी भांडण सोडविले. गावातील उपसरपंच रविंद्र वलके तेथे आले होते. त्यानंतर मी देवळी पोलीस ठाण्यात गेलो. आता मला रिपोर्ट व छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.P1/PW1 व P2/PW1 देण्यात येते. ज्या काठयांनी मला मारले, त्या काठया मी ओळखू शकतो. जप्त मुद्देमाल क्र.६९/२०२६ सिलबंद आहे. न्यायालयासमक्ष त्याचे सिल उघडण्यात काढण्यात आले. आता मला दाखविण्एयात आलेली काठया क्र.१ व २ या त्याच काठया आहेत. त्यास **भौतिक वस्तु क्र.१ व २** देण्यात येते. आरोपी क्र.१ ते ४ आज न्यायालयासमक्ष हजर आहे, ज्यांनी मला मारले होते. घटनेबाबत पोलीसांनी माझी विचारपूस केली होती. आरोपी क्र.३ रुपाली हिने मला मारले नाही, ती सोबत होती.

**साध्यस्थितीत साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणी घेण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात येते**.

२. हे म्हणणे खरे आहे की, संजय चचाणे याने मला डोक्यावर व डाव्या हातावर काठीने मारले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ याने उजव्या पायाच्या पोटरीवर व गुडघ्यावर मारले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ रुपाली चचाणे हिने हाताबुक्यांनी पाठीवर मारले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.४ ने माझी कॉर्लर धरुन माझ्या गालावर थापडा मारल्या. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीसांनी देवळी येथील सरकारी दवाखान्यात नेले होते.

**उलटतपास आरोपी क्र. १ ते ४ तर्फे – श्री.राजेंद्र व्ही.मुन, अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर**

**उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे स्वतः घेण्याचे नाकारले.**

**उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे स्वतः घेण्याचे नाकारले.**

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे स्वतः घेण्याचे नाकारले.**

**उलटतपास आरोपी क्र.४ तर्फे स्वतः घेण्याचे नाकारले.**

फेरतपास नाही.

उलटतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृती | माझे समक्ष |
| MRUNAL YASHWANT DOIPHODE — Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.08.05 16:46:47 +0530 | MRUNAL YASHWANT DOIPHODE — Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.08.05 16:46:41 +0530 |
| (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) | (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक ०५.०८.२०२६ | वर्धा, दिनांक ०५.०८.२०२६ |